# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः19.05.2025** **वारःसोमवार**

1. उपग्रह प्रक्षेपणातील अपयशाची चौकशी करण्यासाठी इस्रोकडून समिती स्थापन
2. ऑपरेशन सिंदूरनं सैन्यदलांचं अचूक, व्यावसायिक आणि निर्धारित उद्दीष्ट साध्य करण्याचं सामर्थ्यं दाखवून दिलं
3. महाराष्ट्रातल्या सोलापूर आग दुर्घटनेतील मृतांच्या वारसांना पंतप्रधान राष्ट्रीय निधीतून मदत जाहीर
4. आयपीएल क्रिकेट स्पर्धेतल्या कालच्या सामन्यांमध्ये गुजरात टायटन्स आणि पंजाब किंग्ज संघांचा विजय आणि
5. कोकण, गोवा, कर्नाटक आणि केरळच्या किनारपट्टी भागात पुढचे पाच दिवस मुसळधार पावसाचे

**इस्रो समिती**

इस्रो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थाने पीएसएलव्ही रॅकेटने पृथ्वी निरीक्षण उपग्रह, ईओएस-09 ला त्याच्या इच्छित कक्षेत स्थापित करण्यात अपयशी ठरल्याच्या घटनेची चौकशी करण्यासाठी एक समिती स्थापन केली आहे. इस्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन म्हणाले की समितीने काल कारण शोधण्यासाठी व्यापक चर्चा केली. संबंधित रॅकेटने चारपैकी पहिले दोन टप्पे यशस्वीरित्या पूर्ण केले मात्र तिसऱ्या टप्प्यात एक विसंगती आढळून आली आणि मोहीम पूर्ण होऊ शकली नसल्याचं डॉ. नारायणन यांनी म्हटलं आहे. इस्रो आपले प्रक्षेपण कार्यक्रम पुढे सुरू ठेवणार असून या वर्षी दर महिन्याला एक मोहीम नियोजित करण्यात आली असल्याचं डॉ. नारायणन यांनी म्हटलं आहे.

**संरक्षण मंत्रालय**

तीनही सैन्यदलांच्या योग्य समन्वयातून, धोरणात्मक सखोलता दर्शवत आणि तांत्रिक वर्चस्वाच्या माध्यमातून यशस्वीपणे राबवलेलं ऑपरेशन सिंदूर म्हणजे भारतीय संरक्षण क्षेत्रातला महत्त्वाचा टप्पा होता असं संरक्षण मंत्रालयानं नमूद केलं आहे. ऑपरेशन सिंदूरनं सैन्यदलांचं अचूक, व्यावसायिक आणि निर्धारित उद्दीष्ट साध्य करण्याचं सामर्थ्यं दाखवून दिलं. सध्याच्या बहुस्तरीय युद्धपद्धतीच्या काळात भारताच्या लष्करानं आपली एकतेची ताकद आणि धोरणात्मक दृष्टीकोन यांच्या बळावर नियंत्रण रेषेसह पाकिस्तानच्या अंतर्गत भागातली दहशतवाद्यांची आश्रयस्थानं उद्ध्वस्त केली. पहलगाम दहशतवादी हल्ल्याला भारतानं सविस्तर तरीही अचूक नियोजन करुन आणि बौद्धिक सामर्थ्याचा वापर करुन सामान्य नागरिकांना कमीत कमी हानी पोहोचेल अशा रितीनं उत्तर दिलं.

**सीजफायर**

भारत आणि पाकिस्तानमधील युद्धबंदी काल संपल्याचा दावा करणाऱ्या वृत्तांना भारतीय लष्कराने फेटाळून लावले आहे. 18 मे रोजी भारत आणि पाकिस्तानी बाजूने लष्करी कारवाई महासंचालक पातळीवरील कोणतीही चर्चा नियोजित नव्हती असं भारतीय लष्कराकडून सांगण्यात आलं. दोन्ही देशांच्या लष्करी कारवाई महासंचालकांच्या 12 मे रोजी झालेल्या चर्चेप्रमाणे युद्धबंदी संपण्याची कोणतीही तारीख देण्यात आली नाही.

**परराष्ट्रमंत्री**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर आज सहा दिवसांच्या युरोप दौऱ्यावर रवाना होतील. या दौऱ्यात ते नेदरलँडस, डेन्मार्क आणि जर्मनीला भेट देऊन तिथल्या परराष्ट्र मंत्र्यांसोबत द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. यामध्ये परस्पर हिताच्या क्षेत्रिय आणि जागतिक मुद्द्यांवरदेखील चर्चा होईल.

**परदेशी गुंतवणूक**

मे महिन्यात भारतीय शेअर बाजारात आतापर्यंत 18 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त परकीय गुंतवणूक झाली आहे. जागतिक बाजारातलं सकारात्मक वातावरण आणि देशांतर्गत परिस्थितीत झालेली सुधारणा यामुळे परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी 18 हजार 620 कोटी रुपये गुंतवणूक केली आहे. जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांच्या कालावधीत गुंतवणूकदारांनी मोठ्या प्रमाणात पैसे काढण्यावर भर दिल्यानंतर एप्रिल महिन्यात पुन्हा गुंतवणुकीचा ओघ वाढण्यास सुरुवात झाली.

**सोलापूर आग**

महाराष्ट्रात सोलापुरमधल्या अक्कलकोट रस्त्यावरील औद्योगिक वसाहतीमधील सेंट्रल टेक्सटाईल मिल टॉवेल कारखान्याला काल शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत आठ जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे. अग्निशामक दलानं जवळपास पाच ते सहा तासांच्या प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांप्रती शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत. दरम्यान, पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून या दुर्घटनेतील मृतांच्या वारसांना 2 लाख रुपये तर जखमींना 50 हजार रुपये मदत देण्याची घोषणा पंतप्रधानांनी केली आहे.

**एनसीसी माउंट एव्हरेस्ट**

राष्ट्रीय छात्र सेना अर्थात एनसीसीच्या छात्रांनी नुकतंच माउंट एव्हरेस्ट हे सर्वोच्च शिखर सर केलं आहे. हवामान आणि प्रादेशिकतेच्या अत्यंत कठीण आव्हानांचा सामना करत या 18-19 वर्षांच्या छात्रांनी एव्हरेस्टवर तिरंगा आणि एनसीसीचा ध्वज फडकवला. सियाचीन इथल्या लष्कराच्या गिर्यारोहण प्रशिक्षण संस्थेत एनसीसीच्या देशभरातल्या निवडक 15 छात्रांना गिर्यारोहणाचं बर्फाळ प्रदेशाबाबतचं आणि तांत्रिक प्रशिक्षण देण्यात आलं होतं. त्यातील 10 छात्रांची या मोहीमेसाठी निवड करण्यात आली होती. नेपाळमधल्या शेर्पांनीही या विद्यार्थ्यांच्या शारिरीक तंदुरुस्तीचं आणि मनोधैर्याचं कौतुक केलं. पाच विद्यार्थी, पाच विद्यार्थिनी आणि चार अधिकारी तसंच दोन कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या या पथकानं गेल्या 3 एप्रिल रोजी नवी दिल्लीतून एव्हरेस्ट मोहीम सुरू केली होती.

**सागर में सम्मान**

केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी काल 'सागर में सम्मान' या उपक्रमाची सुरुवात केली. केंद्र सरकारचा हा धोरणात्मक उपक्रम असून याद्वारे सागरी क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढवणे हा उद्देश आहे. मुंबईत काल झालेल्या आंतरराष्ट्रीय सागरी महिला दिनाच्या उद्घाटन समारंभात हा उपक्रम सुरू करण्यात आला. सागरी क्षेत्रात 2014 मध्ये 341 वरून 2024 मध्ये 2557 पर्यंत महिला खलाशांची संख्या वाढली असल्याचं सोनोवाल यांनी यावेळी सांगितलं. यावेळी सोनोवाल यांच्या हस्ते भारतीय सागरी क्षेत्रातील उत्कृष्ट महिलांचा सन्मान करण्यात आला.

**आयएमएफ**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं पाकिस्तानला मदतनिधीचा पुढचा हप्ता देण्यासाठी आणखी 11 नवीन अटी घातल्या आहेत. यामुळे अर्थसहाय्यासाठी पाकिस्तानवर लादलेल्या अटींची संख्या आता 50 झाली आहे. तसंच भारतासोबतचा तणाव वाढल्यास त्याचा मदत योजनेच्या आर्थिक, परराष्ट्रीय आणि सुधारणा उद्दीष्टांवर परिणाम होऊ शकतो असा इशारा नाणेनिधीनं दिला आहे. नव्या अटींमध्ये नवीन 17 ट्रिलियनपेक्षा अधिक खर्चाच्या अंदाजपत्रकाला संसदेत मंजूरी, वीजबिलांवर अधिभार लावणं तसंच तीन वर्षांपेक्षा जास्त काळ वापरलेल्या मोटारींवरील आयातशुल्क कमी करणं यांचा समावेश आहे.

**पुतीन**

युक्रेनमधली मोहीम सुरू ठेवून आपलं निर्धारित उद्दीष्ट साध्य करण्याचं पुरेसं लष्करी सामर्थ्य रशियाकडे आहे असं रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी म्हटलं आहे. रशियाला आण्विक शस्त्रांचा वापर करण्याची चूक करायला भाग पाडण्याचे अनेक प्रयत्न केले गेले मात्र अशा प्रयत्नांना बळी न पडता आपलं उद्दीष्ट साध्य करण्यासाठीची लष्करी ताकद रशियाकडे आहे

असं पुतीन यांनी रशियाच्या सरकारी दूरचित्रवाणी वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं. संघर्षाचं मूळ कारण नष्ट करणं, दीर्घकालिन शांतता प्रस्थापित करणं आणि रशियाची सुरक्षा हा युक्रेन मोहीमेचा हेतू असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

**<u>सोनेजप्ती</u>**

मुंबईतल्या सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी काल दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये 5 किलो 750 ग्रॅम वजनाचं 5 कोटी 10 लाख रुपये किमतीचं सोनं जप्त केलं. या दोन्ही घटनांमध्ये विमानतळावरील कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून सोन्याची तस्करी करण्यात आल्याचं उघडकीस आलं आहे.

**<u>फुटबॉल</u>**

19 वर्षांखालील दक्षिण आशियाई फुटबॉल महासंघाच्या फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धेत भारतानं विजेतेपद पटकावलं. अरुणाचल प्रदेशमधल्या युपिया इथं काल झालेल्या चुरशीच्या अंतिम सामन्यात भारतीय संघानं पेनल्टी शूट आउटमध्ये बांग्लादेशच्या संघावर 4-3 अशा गुणांनी मात केली. भारतीय संघाचा कर्णधार शामी यानं सामन्यात दुसऱ्याच मिनिटांत बांग्लादेशविरुद्ध पहिला गोल केला. बांग्लादेशच्या संघानं शेवटच्या काही मिनिटांत गोल करत सामन्यात बरोबरी साधली. मात्र निर्णायक क्षणी शामीनं केलेल्या गोलमुळे भारताला विजय मिळवता आला.

**<u>आयपीएल</u>**

आयपीएल क्रिकेटमध्ये, गुजरात टायटन्सने काल दिल्ली कॅपिटल्सचा 10 गडी राखून पराभव केला. 200 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना साई सुदर्शनच्या नाबाद शतकाच्या आणि कर्णधार शुभमन गिलच्या 93 धावांच्या जोरावर गुजरातने हे आव्हान सहज पार केलं. साई सुदर्शनला सामनावीर म्हणून गौरवण्यात आलं. तर दिल्लीकडून केएल राहुलने नाबाद शतक ठोकलं. या विजयासह, गुजरात टायटन्सने गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावत प्लेऑफसाठी पात्रता मिळवली. याशिवाय, रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि पंजाब किंग्ज यांनीही प्लेऑफमध्ये स्थान मिळवले आहे. तर काल झालेल्या दुसऱ्या सामन्यात पंजाब किंग्ज संघाने राजस्थान रॉयल्सचा दहा धावांनी पराभव केला. पंजाबने दिलेल्या 220 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, राजस्थान रॉयल्सने 7 बाद 209 धावा केल्या. राजस्थानकडून ध्रुव जुरेलने सर्वाधिक 53 धावा केल्या. यशस्वी जयस्वालनेही 50 धावांचे योगदान दिले. पंजाबकडून नेहल वधेरा आणि शशांक सिंग यांनी अर्धशतके फटकावली. हरप्रीत ब्रारने 3 बळी घेतले त्याला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले. आज लखनौ सुपर जायंट्सचं लखनौ इथं सनरायझर्स हैदराबादशी सामना होणार आहे.

**<u>हवामान</u>**

पुढचे पाच दिवस कोकण, गोवा, कर्नाटक आणि केरळ तसंच आसपासच्या भागात जोरदार ते अती जोरदार पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे. ईशान्य भारत, पश्चिम बंगाल आणि सिक्कीमच्या हिमालयीन भागातही वादळी वारे आणि वीजांसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. राजस्थानच्या पश्चिम भागात मात्र आणखी चार दिवस उष्णतेची लाट कायम राहील तर ओडीशामध्ये उष्ण आणि दमट हवामान असेल. येत्या दोन दिवसांत जम्मू काश्मीर, लडाख, गिलगिट, बाल्टिस्तान, मुझफ्फराबाद आणि हिमाचल प्रदेशात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल. मान्सून पुढे सरकण्यासाठी सध्या अनुकूल वातावरण असून पुढच्या 2-3 दिवसांत बंगालच्या उपसागरात आणखी पुढे सरकेल असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.